## महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

### *जलसंपदा विभाग*

अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,नाशिक-४



# नागरिकांची सनद

(दि. २१/०२/२०१२)

# सूची


| अनुक्रमांक | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | |
| २. | संस्थेची रचना व बांधिलकी | |
| ३. | संस्थेच उद्दिष्टे / वेळापत्रक / नागरिकांची जबाबदारी व सनदेचा आढावा | |
| ४. | सनदेची अंमलबजावणी | |
| ५. | संघटना तक्ता | |

## १. प्रस्तावना-

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागातील एक महत्वाचा विभाग आहे. हा विभाग नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधिल आहे. ही बांधिलकी महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक या सनदेद्वारे जाहीर करीत असून ती स्विकारत आहे. सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूक मिळून उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतिपूर्वक सोडवावे हा दृष्टीकोन ही सनद तयार करतांना नजरेसमोर ठेवत आहे.

संस्थे संबंधित विषयातील माहिती समाजातील कोणीही सर्वसामान्य जागरुक नागरिक, स्वयंसेवी संस्था इ.ना मिळवून घेण्याची इच्छा असू शकते. या विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या या नागरिकांच्या सनदेचा मुख्य उद्देश हा वरील संबंधित माहितीचे स्वरुप काय असेल, ही माहिती कोणत्या अधिका-याकडे मिळेल व मिळविण्यासाठी किती कालावधी लागेल याची निश्चित ग्वाही देणे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे हा **आहे.** या संस्थेमार्फत केल्या जाणा-या संशोधनाच्या अभ्यासाबरोबर खालीलप्रमाणे माहितीचा अंतर्भाव सनदेत करण्यात आलेला आहे.

१. सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.
२. सर्व कार्यालयांतून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहीररित्या प्रदर्शित करणे.
३. कार्यलयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी/तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.
४. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.
५. विभागाच्या कामकाजात सातत्य ठेऊन व आधुनिकता आणून विभागाची लोकभिमुखता वाढविणे.
६. नागरीकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.
७. संस्थेचे संकेतस्थळ (Website) कार्यान्वित झाले आहे. (www.merinashik.org) सदर माहिती विभागामार्फत त्यांचे संकेतस्थळी ठेवण्यात आली असून ती नियमित अद्ययावत केली जाते. जागरुक नागरिक, स्वयंसेवी संघटना, इंटरनेटच्या माध्यमातून देखील वरील माहिती घेऊ शकतात.

## *महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था*

**१.१ संशोधनात्मक कामे :**

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेची स्थापना एप्रिल १९५९ मध्ये करण्यात आली. ही संस्था मुख्यत: विविध प्रकल्पांच्या क्षेत्रिय समस्यांशी संबंधित उपयोजित संशोधनाची (Applied Research) कामे करते. राज्यस्तरावरील संशोधन संस्था असल्याने संपूर्ण महाराष्ट्र हे मेरीचे कार्यक्षेत्र आहे. राज्यातील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या तीन विभागातील संशोधन विषयक कामांसाठी या संस्थेची निर्मिती करण्यात आली आहे.

उपयोजित संशोधनाची कामे मुख्यत: क्षेत्रिय अधिकारी आणि मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून संस्थेकडे सोपविली जातात. मूलभूत संशोधनाची कामे संस्था स्वत:च अंगिकारते किंवा भारत सरकारच्या जलसंसाधन मंत्रालय आणि / किंवा वाहतूक मंत्रालयांतर्गत असलेल्या विविध राष्ट्रीय स्तरावरील संस्थांकडून विविध योजनांखाली मेरीकडे सोपविली जातात. संशोधन कामांव्यतिरिक्त बांधकाम सामग्रीच्या गुणवत्ता चाचण्या, मिश्र संधानक, ॲस्फाल्ट मिक्स संकल्पन ही कामेही मेरीत केली जातात. निमशासकीय आणि खाजगी संस्थांकडून येणाऱ्या कामांसंबंधीचे उपयोजित संशोधन व चाचणी कामेही मेरीत केली जातात.

**१.२ कामाचे स्वरुप :** संस्थेमध्ये करण्यात येणाऱ्या कामांचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

**(१) जलगती संशोधन विभाग क्र. १** : धरणांचे सांडवे, विमोचके, पूर संरक्षक कामे, उल्लोळ (Surge) व्यवस्था, पुलांचे आराखडे यांच्या जलीय प्रतिकृतींचे अभ्यास करण्यासाठी संस्थेमध्ये पायाभूत सुविधा असलेली मोठी जलगती प्रयोगशाळा आहे.

**(२) जलाशय गाळ सर्वेक्षण विभाग :** जलाशयांमध्ये साठणाऱ्या गाळाचे तीन पद्धतींनी सर्वेक्षण संस्थेमध्ये केले जाते. १) पारंपरिक पद्धत, २) डीजीपीएस् (Differential Global Positioning System) पद्धतीने ३) सुदूर संवेदन तंत्रज्ञान तसेच Hybrid Technique द्वारे गाळ सर्वेक्षणाची कामे केली जातात. सुदूर संवेदन तंत्रज्ञान वापरुन संस्थेने आतापर्यन्त महाराष्ट्रातील तसेच इतर राज्यातील बऱ्याच प्रकल्पांच्या जलाशयांचे गाळसर्वेक्षणाचे काम केली आहेत.

**(३ ) मृद्यांत्रिकी संशोधन विभाग क्र. १:** मृद्यांत्रिकी शाखेमध्ये उपयोजित आणि मूलभूत संशोधनाबरोबरच प्रकल्पांसाठी चाचणी कामे करण्यात येतात. महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी मातीच्या अभियांत्रिकी गुणधर्मांच्या (Engineering Properties) चाचण्या विभागात करण्यात येतात आणि त्या गुणधर्मांवर आधारित धरणांचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेद्वारे करण्यात येते.

**(४) सामुग्री चाचणी विभाग :** बांधकाम सामग्रीच्या विविध चाचण्या (जसे सीमेंट, वाळू, दगड, विटा, पाईप, लोखंड, चुना (Lime), फ्लाय ॲश) केल्या जातात. संस्थेमध्ये ९०० मिमी व्यासाचे मोठे काँक्रीट अथवा बांधकामाचे दंडगोल (Cylinders) २००० टन दमनक्षमतेच्या यंत्रावर दमनसामर्थ्यासाठी तपासण्याची सोय उपलब्ध आहे. क्षेत्रिय कामांच्या आवश्यकतांनुसार वेगवेगळ्या प्रकारची मिश्र संकल्पने करुन दिली जातात.

**(५) संरचनात्मक संशोधन व पदार्थविज्ञान विभाग :** संरचनात्मक संशोधन व पदार्थ विज्ञान शाखेमध्ये बांधकामांच्या चाचण्या, पूल-जलसेतू- स्लॅबज् यांच्या भार चाचण्या, बांधकामांचे संरचनात्मक विश्लेषण आणि पाषाण यांत्रिकी मधील चाचण्या केल्या जातात. बांधकामाची गुणवत्ता तपासण्यासाठी अविनाशी चाचण्या (Non Destructive Testing) करण्याची सोय या विभागामध्ये आहे. तसेच पिण्याच्या पाण्याचे आणि सांडपाण्याचे विश्लेषण, चाळ (Gravel) आणि गाळणीची वाळू (Filter sand), ब्लिचिंग पावडर, तुरटी इ. वरील चाचण्या संस्थेमध्ये केल्या जातात.

**(६) सुदूर संवेदन व भूमाहितीशास्त्र विभाग :** सुदूर संवेदन तंत्रज्ञानाने नदी खोरे प्रकल्पात जलाशयांमध्ये साठलेल्या गाळाचे सर्वेक्षण, पीक मोजणी व पडताळणी (Crop mapping), जमीन आणि जमीन वापर इ. कामे या विभागात केली जातात. तसेच या विभागात उपग्रहाकडून प्राप्त अंकीय प्रतिमा संगणकात उतरविणे, प्रक्रिया करणे आणि प्रतिमेचे विश्लेषण करण्याच्या सुविधा आहेत.

**(७) महामार्ग अभियांत्रिकी संशोधन विभाग क्र. १:** रस्त्यांच्या बांधकाम सामग्रीच्या गुणवत्ता चाचण्या विभागाच्या प्रयोगशाळेत केल्या जातात. वाहतूक अभ्यास (Traffic Census Study), रस्त्यांच्या उपयोजित संशोधनाची कामेही क्षेत्रिय आवश्यकतांनुसार करण्यात येतात.

**(८) उपकरणे संशोधन विभाग :** धरणांमधील तणाव, जलाशयातील पाणी पातळीचे धरणावर होणारे परिणाम कळण्यासाठी राज्यातील विविध धरणांमध्ये बसविण्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या उपकरणांची खरेदी, उपकरणे बसविणे (Installation), काही उपकरणांची निर्मिती तसेच दुरुस्ती करणे या विभागात केली जाते. उपकरणांद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण केले जाते. शासनास जलसंसाधन प्रकल्पांसाठी लागणाऱ्या विविध आधुनिक शास्त्रीय आणि गणिती उपकरणांच्या खरेदीचे ' खरेदी सल्लागार समिती 'ब' चे कामही या विभागाकडे आहे. संस्थेच्या विद्युत देखभालीसाठी स्वतंत्र कक्ष या विभागांतर्गत कार्यरत आहे.

**(९) भूकंप आधार सामग्री पृथ:करण विभाग :** महाराष्ट्रातील भूकंपविषयक माहिती संकलित करण्याच्या दृष्टीने संस्था ' नोडल एजन्सी ' आहे. विविध पाटबंधारे प्रकल्पांवर बसविलेल्या भूकंपमापक उपकरणांद्वारे प्राप्त झालेल्या भूकंप माहितीचे विभागात विश्लेषण केले जाते. राज्यातील भूकंप विषयक माहितीची त्रैमासिक पत्रिकाही तयार केली जाते. कंपनांचा (Vibrations) चा बांधकामांवर होणाऱ्या परिणामांचाही या विभागात अभ्यास केला जातो. संस्थेच्या स्थापत्य देखभालीसाठी स्वतंत्र कक्ष या विभागांतर्गत कार्यरत आहे. तसेच संस्थेचे लेखाविषयक काम भूकंप विभागाद्वारे केले जाते.

### १.२.११ तांत्रिक अहवाल :

संशोधन समस्येचा अभ्यास पूर्ण झाल्यावर त्याचा एक स्वतंत्र, समग्र ' तांत्रिक अहवाल' तयार करुन संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना पाठविण्यात येतो. अभ्यासाचा तपशील, निरीक्षण तक्ते, आकृत्या, छायाचित्रे यांचा त्यात समावेश असतो. निवडक तांत्रिक अहवाल 'Technical Memoranda' म्हणून छापून विविध कार्यालयांना पाठविले जातात.

### १.३ मध्यवर्ती ग्रंथालय :

सर्व संशोधन विभागांमध्ये त्यांची स्वतंत्र ग्रंथालये आहेत. त्याव्यतिरिक्त सर्वांच्या उपयोगासाठी एक मध्यवर्ती ग्रंथालय आहे. मध्यवर्ती ग्रंथालयात ३२००० पेक्षा जास्त शास्त्रीय आणि अभियांत्रिकी विषयांवरील पुस्तके आहेत. विविध शास्त्रीय आणि तांत्रिक नियतकालिके मध्यवर्ती ग्रंथालयात येत असतात.

### २.० संस्थेची रचना :

संस्था मा. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, मेरी, नाशिक व मा. मुख्य अभियंता,संकल्पन,प्रशिक्षण,संशोधन व सुरक्षितता,म.अ.प्र.प्र.,नाशिक यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे. संस्थेचे प्रशासकीय कार्यालय नाशिक येथे आहे.

संशोधन आणि चाचणीकामे नऊ ( ९ ) संशोधन विभागांमध्ये केली जातात. विभागाचा प्रमुख संशोधन अधिकारी / वैज्ञानिक संशोधन अधिकारी हा कार्यकारी अभियंता दर्जाचा अधिकारी आहे. अधीक्षक अभियंता व सहसंचालक हे संस्थेच्या दैनंदिन कार्यवाही करण्यासाठी महासंचालकांचे सहाय्यक आहेत. या मोठ्या संस्थेच्या स्थापत्य आणि विद्युत देखभालीसाठी एक स्वतंत्र कक्ष आहे. संस्थेचे लेखाविषयक कामही या कक्षाद्वारेच केले जाते.

**३.० बांधिलकी-**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना संस्था-

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील

ब) सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेऊन कामाच्या वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध माहिती नागरिकांना उपलब्ध करण्यात येईल.

**४.० नागरिकांची जबाबदारी-**

* शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

* नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

* नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

* विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

* नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

**५.० संस्थेचे उद्दिष्ट व वेळापत्रक -**

**अ) उद्दिष्टे-**

राज्यातील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील संबंधीत संशोधनाची व चाचणी कामे करणे.

**ब) वेळापत्रक**

संस्थेमार्फत हाताळल्या जाणा-या समस्यांसाठी /चाचण्यांसाठी आवश्यक आधारसामग्री उपलब्ध झाल्यावर तसेच कामाची व्याप्ती तपासून अनुदान उपलब्धतेनूसार कामाचा कालावधी निश्चित करण्यात येतो. व त्यानुसार कार्यवाही होते.

नैसर्गिक आपत्ती,कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कालावधीत बदल होऊ शकतो.

**६.० अ) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन**

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत संस्थेकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येईल.

**ब) जनसामान्यांकडून सूचना-**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन त्यात

वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच संस्थेच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**६. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी-**

म.अ.सं.संस्था या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी १/१/२०१२ पासून करण्यास कटीबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

म.अ.सं.संस्था ,नाशिक खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. संस्थेच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील,सौजन्यपूर्ण मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख,सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल तसेच नागरिकांच्या गा-हाण्याचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.